सकाळ
सातारा, सोमवार, १० मे २०२१

# साताऱ्यात कर्मवीर पुण्यतिथी साधेपणाने

**सातारा, ता. ९ :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची ६२ वी पुण्यतिथी संस्थेच्या वतीने अत्यंत साधेपणाने झाली.

सकाळी नऊ वाजता पालकमंत्री बाळासाहेब पाटील आणि संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते कर्मवीर समाधीस पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. कोरोनामुळे शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून अण्णांच्या समाधीस अभिवादन करण्यात आले. त्यावेळी डॉ. भारती पाटील, संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड, संस्थेचे कायदा सल्लागार अॅड. दिलावरसाहेब मुल्ला, संस्थेचे ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे व मान्यवर उपस्थित होते.

कर्मवीर समाधीस मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण केल्यानंतर पालकमंत्री पाटील यांनी डॉ. अनिल पाटील यांच्याकडून संस्था स्तरावरील कोविड-१९ या विषाणूमुळे बाधित झालेल्या सेवकांची माहिती घेतली. या वेळी डॉ. पाटील यांच्या हस्ते पालकमंत्री पाटील यांचा रयत महावस्त्र, कर्मवीर अण्णांचा चरित्रग्रंथ आणि संस्थेचे माहिती किट देऊन सत्कार करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेस राज्य शासनाने कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठास मान्यता दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



**सातारा : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधीस पुष्पचक्र वाहून अभिवादन करताना पालकमंत्री बाळासाहेब पाटील, डॉ. अनिल पाटील आदी.**
(**उल्हास भिडे :** सकाळ छायाचित्रसेवा)

## कोरोना लढ्यात रयतचे योगदान

रयत शिक्षण संस्थेतील सर्व सेवकांनी सामाजिक बांधिलकी म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २.७५ कोटी रुपये मदत केली आहे. त्याचबरोबर संस्थेतील सर्व सेवक आणि विद्यार्थी जे या कोविड विषाणूमुळे बाधित झाले आहेत किंवा दुर्दैवाने ज्यांचा मृत्यू झाला आहे. अशांना मदत म्हणून एक कोटी २० लाख रुपयांचा निधी उभा केल्याचे सांगितले. त्याचबरोबर संस्थेच्या ३९ शाखांमध्ये कोविड मार्गदर्शन व मदत केंद्र उभारले आहे, अशी माहिती डॉ. पाटील यांनी दिली.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.